# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी : २५६०१२६१
फॅक्स : ०२०.२५६९९२३२

गणेशखिंड,
पुणे ४११००७.

संदर्भ: शै.प्रवेश/३६९३ दिनांक : १९/०९/२०१८

**तातडीचे/महत्वाचे**

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्था
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**विषय** :— शिष्यवृत्ती योजनांची MAHADBT पोर्टलवरून ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेबाबत.

**संदर्भ** :— शासन पत्र क्र. ससं/उशि/पुवि/शिष्यवृत्ती/२०१८/दि. १८/०९/२०१८ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेसाठी महाविद्यालयाची माहिती भरताना येणाऱ्या अडचणीचे निराकरण करण्यासाठी मा. सहसंचालक (उच्चशिक्षण पुणे) यांनी दि. २१/०९/२०१८ व दि. २२/०९/२०१८ रोजी कार्यशाळेचे आयोजन केलेले आहे. सोबत शासन पत्राची प्रत जोडत आहे.

तरी शासनपत्रात नमुद केल्यानुसार सर्व महाविद्यालयातील संबधितांनी कार्यशाळेस उपस्थित राहावे.

कळावे, ही विनंती

आपला,

१९/९/२०१८.
उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रत : मा. डॉ. विजय नारखेडे, सहसंचालक (उच्चशिक्षण) पुणे विभाग, पुणे

Desktop\Vidita\Marathi Letters

महाराष्ट्र शासन
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे
१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१
Web - www.jdhepune.info Email - jdhepune@gmail.com

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक - ससं/उशि/पुवि/शिष्यवृत्ती/२०१८/ दिनांक - १८ सप्टेंबर, २०१८

प्रति,

प्राचार्य,

अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायमविनाअनुदानित

कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र व शारीरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये

पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.

**विषय – शिष्यवृत्ती योजनांची MAHADBT पोर्टलवरुन ऑनलाईन पद्धतीने अंमलबजावणी करणेबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या समक्रमांक दिनांक ०४.०९.२०१८ च्या पत्रान्वये या विभागाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित, विना अनुदानित, कायम विनाअनुदानित अभ्यासक्रम, अभ्यासक्रमांचे शुल्क व इतर आवश्यक माहिती अचूकपणे **mahadbtmahait.gov.in** या पोर्टलवर भरण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. परंतू महाविद्यालयांची माहिती (**Institute Profile**) भरतांना त्यामध्ये अडचणी येत आहेत असे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे महाविद्यालयाची माहिती भरतांना येणा-या अडचणींचे निराकरण करण्यासाठी खाली नमुद केलेल्या ठिकाणी कार्यशाळांचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी खाली नमूद केलेल्या ठिकाणी संबंधीत जिल्ह्यातील अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायमविना अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी उपस्थीत रहावे.

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव | दिनांक | वेळ | जिल्हा |
|---|---|---|---|---|
| १ | टाटा हॉल, नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे | २१/०९/२०१८ | सकाळी ११.०० वाजता | फक्त पुणे शहर व पिंपरी चिंचवड आणि पुणे जिल्ह्यातील महाविद्यालये |
| ३ | संगमनेर नगरपालिका महाविद्यालय, | २२/०९/२०१८ | सकाळी ११.३० वाजता | अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातील सर्व महाविद्यालये |

तसेच ज्या महाविद्यालयांनी त्यांचे महाविद्यालयांची माहिती (**Institute Profile**) पूर्णपणे भरुन या कार्यालयाकडे पाठविलेली आहेत त्या महाविद्यालयांच्या माहितीला (**Institute Profile**) मान्यता देण्याचे काम

देखील वरील ठिकाणी करण्यात येणार आहे. तरी अशा सर्व महाविद्यालयांनी त्यांची खालील माहिती येताना पेन ड्राईव्हमध्ये तसेच हार्डकॉपी सोबत आणणे आवश्यक आहे.

१. महाविद्यालय सुरु करण्यास शासनाने/विद्यापीठाने दिलेले मान्यतेचे पत्र.

२. महाविद्यालय सुरु झाल्यानंतर एखादी विद्याशाखा/विषय नव्याने सुरु करण्यात आलेली असल्यास त्यास शासनाने/विद्यापीठाने दिलेल्या मान्यतेचे पत्र.

३. महाविद्यालयास विद्यापीठाने दिलेल्या संलग्नीकरणाचे पत्र.

४. महाविद्यालयाचे खाते ज्या बँकेमध्ये आहे त्या खात्याच्या माहितीचा तपशील.

५. शासनाने/विद्यापीठाने ठरवून दिलेल्या शिक्षण फी व इतर फीचे पत्र/परिपत्रक.

तरी ज्या महाविद्यालयांना महाविद्यालयांची माहिती (**Institute Profile**) भरतांना अडचणी येत आहेत आणि ज्या महाविद्यालयांनी त्यांची महाविद्यालयांची माहिती (**Institute Profile**) पूर्णपणे भरुन या कार्यालयाकडे मान्यतेस्तव सादर केलेली आहे त्या सर्व महाविद्यालयांनी उपरोक्त ठिकाणी उपस्थीत रहावे.

**तसेच वरील प्रशिक्षण कार्यक्रमानंतर या विभागाच्या अधिपत्याखालील सर्व अशासकीय अनुदानित/विना अनुदानित आणि कायम विनाअनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र व शारीरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे Institute Profile ला मान्यता देण्यासाठी जिल्हानिहाय दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ ते २७ सप्टेंबर, २०१८ या कालावधीसाठी कार्यशाळा आयोजीत करण्यात येत असून त्याची सविस्तर माहिती स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येईल.**

(डॉ. विजय नारखेडे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे